847

# विनियम

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
व्यवस्थापन समिती, शिर्डी - ४२३ १०९
दिनांक : - **जावक नंबर-३३८६**
**दिनांक-०५/०२/२०२६**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४

क्रमांक :-एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/ /२०२५ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४) याचे कलम १५ चे पोटकलम २ सह उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (झ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) चे व्यवस्थापन समितीस सेवाप्रवेश विनियम तयार करण्याचे अधिकार आहेत. तथापि, सद्यस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) येथे व्यवस्थापन समिती नसून तदर्थ समिती कार्यरत आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल जनहित याचिका क्रमांक ९८/२०२१ मध्ये सिव्हील अॅप्लीकेशन क्रमांक ८७०७/२०२३ दि.०९/०५/२०२४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तदर्थ समिती याद्वारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल या विभागांच्या अंतर्गत **वैद्यकीय अधिक्षक** (Medical Superintendent) **आणि वैद्यकीय प्रशासक** (Medical Administrator), गट-अ या पदावरील नियुक्ती करीता पुढील विनियम करीत आहे.

१. (१) या विनियमांना **वैद्यकीय अधिक्षक** (Medical Superintendent) **आणि वैद्यकीय प्रशासक** (Medical Administrator), गट-अ (सेवाप्रवेश) विनियम, २०२५ असे संबोधण्यात येईल.
(२) ते राज्य शासनाद्वारे संमती दिलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. व्याख्या :-

या विनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षीत नसेलतर, -

(क) "अधिनियम" म्हणजे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४. (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४)
(ख) "मुख्य कार्यकारी अधिकारी" म्हणजे अधिनियमातील कलम १३ अन्वये शासनाने नियुक्त केलेले मुख्य कार्यकारी अधिकारी.
(ग) "समिती" याचा अर्थ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था याची अधिनियमाच्या कलम ५ अन्वये घटीत करण्यात आलेली व्यवस्थापन समिती.
(घ) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ मुख्य कार्यकारी अधिकारी.
(ङ) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची स्नातक पदवी
(च) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.
(छ) "विहित परीक्षा" यांचा अर्थ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी याने एकतर स्वतःहून किंवा त्या प्रयोजनार्थ नियुक्त करण्यात आलेल्या एखाद्या अभिकरणाद्वारे घेण्यात आलेली परीक्षा, असा आहे.

विधि व न्याय विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

(ज) "निवड समिती" याचा अर्थ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (सर्व स्थायी कर्मचा-यांना लागू असलेल्या सर्व साधारण तरतुदी) विनियम, २०२५ या विनियमांच्या परिशिष्ट –एक मध्ये नमुद करण्यात आलेली कर्मचारी निवड समिती असा आहे.

(झ) "विश्वस्तव्यवस्था किंवा संस्थान" याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ३ अन्वये घटीत करण्यात आलेली विश्वस्तव्यवस्था, असा आहे.

**३. वैद्यकीय अधिक्षक (Medical Superintendent) आणि वैद्यकीय प्रशासक (Medical Administrator),** (गट-अ) या पदावरील नियुक्ती-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या अखत्यारीखालील वैद्यकीय अधिक्षक (Medical Superintendent) किंवा वैद्यकीय प्रशासक (Medical Administrator), गट-अ या पदावरील नियुक्ती निवड समितीद्वारे घेण्यात आलेल्या विहित परिक्षेच्या निकालाच्या आधारावर योग्य ठरवलेल्या आणि या विनियमांच्या विनियम ५ मध्ये नमुद केलेली अर्हता धारण करणा-या व्यक्तीच्या नामनिर्देशनाद्वारे करता येईल.

४. वयोमर्यादाः-

(एक) किमान वय - या संदर्भात जारी करण्यात आलेल्या जाहिरातीत नमुद केल्यानुसार संस्थानाकडे अर्ज करण्याच्या अखेरच्या दिनांकास अठरा वर्षांपेक्षा कमी नसावे;

(दोन) अधिकतम वय - या संदर्भात जारी करण्यात आलेल्या जाहिरातीत नमुद केल्यानुसार संस्थानाकडे अर्ज करण्याच्या अखेरच्या दिनांकास, राखीव प्रवर्गा व्यतिरिक्त अन्य प्रवर्गातील उमेदवारांसाठी अडतीस वर्षांपेक्षा अधिक नसावे, तसेच राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी त्रेचाळीस वर्षांपेक्षा अधिक नसावे.

परंतु, केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा निमशासकीय संघटना यांच्या भूतपूर्व कर्मचा-यांच्या बाबतीत अधिकतम वयोमर्यादा ही पंचावन्न वर्षांपर्यंत वाढविता येईल.

५. शैक्षणिक अर्हताः-

या विनियमांनुसार नमुद केलेल्या पदावरील नियुक्तीसाठी उमेदवाराने-

(एक) विद्यापीठाची एम.बी.बी.एस. आणि एम.डी. किंवा एम.एस. ही पदवी धारण केलेली असावी;

(दोन) एमएस-सीआयटी परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी; आणि

(तीन) किमान शंभर रुग्णशय्या असलेल्या रुग्णालयात वैद्यकीय संचालक किंवा वैद्यकीय उप संचालक किंवा वैद्यकीय प्रशासक किंवा वैद्यकीय अधिक्षक म्हणून रुग्णालयातील प्रशासकीय कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

परंतु की, विद्यापिठाची डी.एच.ए. किंवा एम.एच.ए. किंवा एम फिल ही पदवी धारण करणा-या व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल.

परंतु, उच्च अर्हता किंवा विशेष अनुभव किंवा दोन्हीही धारण करणा-या व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल.

विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–४०० ०३२

६. नोंदणीकृत असण्याची आवश्यकता –

संबंधित उमेदवाराने त्याच्या नियुक्तीच्या दिनांकास महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल किंवा राष्ट्रीय मेडीकल कौन्सिलकडे नोंदणी केलेली असावी. आणि अशी नोंदणी त्याच्या पूर्ण सेवेच्या कालावधीत धारण केलेली असावी.

७. परिविक्षाधीन कालावधीः-

विनियम ३ मध्ये नमुद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारासाठी त्याच्या नियुक्तीच्या पदावर हजर झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. परिवीक्षा कालावधी हा समितीच्या मान्यतेने कमाल एक वर्षापर्यंत वाढविता येईल. परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण होणे व प्रशिक्षण पूर्ण करणे (जर असेल तर) अनिवार्य राहिल आणि परिवीक्षा धोरणानुसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास व प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

८. सेवेच्या इतर शर्ती लागू असणेः-

संस्थानाद्वारे वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदी, तसेच शासन निर्णय आणि आदेश आणि संस्थानाद्वारे करण्यात आलेले इतर विनियम, हे, विनियम ३ मध्ये नमुद केलेल्या पदावरील सेवेच्या संदर्भात लागू असतील.

अध्यक्ष, तदर्थ समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

850

# REGULATIONS

**Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi), Shirdi- 423 109.**

Dated the................2025.
**Outward No.3386**
**Date-05/02/2026**

Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004.

No. SSS/WS-GAD/Astha/ /2025 - In exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 15 read with clause (*i*) of section 2 of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 (Mah. XIV of 2004), the Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust has the powers to make the regulations regulating the recruitment. However, at present, there is no Management Committee but an Ad-hoc Committee is functioning at Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi. In pursuance of the decision dated 09/05/2024, of the Hon'ble High Court, Bombay, Bench Aurangabad Civil Application No. 8707/2023 in Public Interest Litigation No 98/2021, the Ad-hoc Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust is hereby pleased to make the following regulations regulating the recruitment to the posts of the **Medical Superintendent** (Group-A), and the **Medical Administrator,** (Group-A) in the Shree Sainath Rugnalaya and in the Shree Sai Baba Hospital of Shree Sai Baba Sansthan Trust under the said Act, as follows:-

1. (*1*) These regulations may be called the **Medical Superintendent** (Group-A) and the **Medical Administrator,** (Group-A) (Recruitment) Regulations, 2025.

(*2*) They shall come into force on the date of their sanction by the State Government.

851

2. In these regulations, unless the context requires otherwise,-

(*a*) "Act" means the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 (Mah. XIV of 2004);

(*b*) "Chief Executive Officer" means the Chief Executive Officer appointed by the Government under section 13 of the Act;

(*c*) "Committee" means the Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust formed under section 5 of the Act;

(*d*) "Competent Authority" means the Chief Executive Officer;

(*e*) "Degree" means a Bachelor's degree of a recognised university;

(*f*) "Government" means the Government of Maharashtra;

(*g*) "prescribed examination " means an examination conducted by the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) either by itself or through any agency nominated by it for the purpose;

(*h*) "Selection Committee" means the Employee's Selection Committee referred to in the Annexure-I to in the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) (General Provisions Applicable to All Regular Employees) Regulations, 2025;

(*i*) "Trust" or "Sansthan" means the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) established under section 3 of the Act.

3. Appointment to the post of the **Medical Superintendent** (Group-A) and the **Medical Administrator** (Group-A) in the Trust, shall be made by nomination from amongst the eligible candidates, on the basis of prescribed examination conducted by the Selection Committee, who fulfils the qualifications specified in regulation 5 of these regulations.

4. Age Limit.-

(i) Lower Age Limit.- Not less than eighteen years of age (completed) as on the last date of submission of applications to the trust, as per the advertisement for recruitment to the said post;

(ii) Upper Age Limit.- Not more than thirty-eight years of age (completed) for the persons not belonging to the reserved categories; and forty-three years of age (completed) for the persons belonging to the reserved categories. The upper age limit shall be applicable as on the last date of submission of applications to the trust, as per the advertisement for recruitment to the said post.

Provided that the upper age limit may be relaxed upto fifty years in case of the candidate who is Ex-employee of a Central Government or a State Government or a Semi Government organization.

5. Educational qualifications.-

The person for being eligible for appointment to the post under these regulations shall,-

(*i*) possess a M.B.B.S. alongwith M.D. or M.S. degree from a university;

(*ii*) have passed the MS-CIT examination; and

(*iii*) shall possess an experience in hospital administration in a hospital having not less than 100 beds as a Medical Director or a Deputy Medical Director or Medical Administrator or Medical Superintendent for not less than three years.

Provided that preference may be given to the person holding D.H.A. or M.H.A. or M.Phil from a recognised university:

Provided further that, preference may be given to the candidate having higher qualification or special experience or both.

6. Requirement as to registration. – It shall be necessary for the candidate to possess the registration with the Maharashtra Medical Council or the National Medical Council on the date of his appointment and he shall continue to possess such registration during his entire period of service.

853

7. Probation period.-

A person appointed to the post mentioned in regulation 3, by nomination, shall be on a probation for a period of one year from the date on which he joins his post on which he is appointed. The probation period may be extended, after approval of the Committee, for a maximum period upto one year. Completion of the probation period (including extended period) to the satisfaction of the appointing authority; and passing of prescribed examinations and training (if any) shall be mandatory. In the event failing to complete the probation period (including extended period) or pass the examinations and complete the training, his services shall be liable to be terminated.

8. Other service conditions to apply.-

The other terms and conditions, specified by the Trust from time to time, as well as the provisions of the Act, the rules made thereunder, the Government Resolutions and orders as well as the provisions of other regulations specified by the Trust shall be applicable in respect of the services to the posts under the mentioned under regulation 3.

Chairman, Ad-hoc Committee,
Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi).